नोबेल पारितोषिक विजेते लेखक इसाक बी सिंगर हे (ZLATEH THE GOAT) या कथेचे लेखक आहेत. मॉरिस सेनडेक या विख्यात चित्रकारानं या पुस्तकातली सुरेख रेखाटनं केलेली आहेत. या पुस्तकाला अमेरिकन लायब्ररी असोसिएशननं (ALA) न्यूबेरी पारितोषिक देऊन गौरवलं आहे.

या कथेवर आधारित असलेली एक सुंदर फिल्म तुम्ही या लिंकवर पाहू शकता.
https://www.youtube.com/watch?v=kwXCHebQ_mE

ZLATEH THE GOAT (English)
http://www.oldtappanschools.org/cms/lib6/NJ01000542/Centricity/Domain/87/Zlateh%20the%20Goat%20Passage.pdf

मित्तो बकरी
इसाक बाशेविस सिंगर

मराठी अनुवाद : नीलांबरी जोशी

ज्यू लोकांचा डिसेंबर महिन्यात येणारा हनुक्का हा एक प्रमुख सण आहे. या महिन्यात साधारणपणे गावाकडून शहरात जाणारे सगळे रस्ते पांढऱ्याशुभ्र बर्फानं झाकले जातात. मात्र या वर्षी थंडीचं प्रमाण जरा कमी होतं. जास्त करुन उबदार उन्हंच पडलेली असायची. एरेन रोयदार हा इसम गावात उबदार कपड्यांसाठी कातडं विकायचा धंदा करुन पैसे मिळवायचा. मात्र थंडी कमी पडल्यानं त्याला यावर्षी फारशी कमाई झाली नव्हती. त्यामुळे एरेननं आपल्याकडची मित्तो ही बकरी विकायची असं ठरवलं. मित्तो एक तर म्हातारी झाली होती, तसंच ती फारसं दूधही देत नव्हती. शहरातल्या कसायानं मित्तोच्या बदल्यात आठ नाणी द्यायचं एरेनला कबूल केलं होतं. त्या पैशांतून हनुक्का या सणासाठी मेणबत्या, बटाटे, तेल आणि मुलांसाठी काही भेटवस्तू आणता आल्या असत्या. घरातल्या इतर काही बारीकसारीक गोष्टीही त्या पैशातून आल्या असत्या. मग एरेननं आपला मोठा मुलगा रुबिन याला 'बकरी शहरात घेऊन जा' असं सांगितलं.

कसायाकडे गेल्यावर बकरीचं काय होणार हे रुबिनला चांगलंच ठाऊक होतं. मात्र त्याला वडिलांच्या आज्ञेचं पालन करणंही भाग होतं. मित्तोची बातमी ऐकून रुबिनच्या आईच्या डोळ्यातून गंगाजमुना वहायला लागल्याच होत्या, तर त्याच्या एना आणि मरियम या दोन बहिणीही हमसाहमशी रडायला लागल्या.

रुबिननं आपलं लोकरीचं जाकिट आणि कानटोपी घातली. प्रवासात खायला लागेल म्हणून त्यानं दोन रोट्या आणि पनीरही खिशात घेतलं होतं. मग त्यानं मित्तोच्या गळ्यात दावण बांधून शहराचा रस्ता पकडला. संध्याकाळपर्यंत शहरात पोचून त्याला मित्तोला कसायाच्या हवाली करायचं होतं. रात्री कसायाकडे मुक्काम करुन दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत तो पैसे घेऊन घरी परतणार होता. रुबिन निघाल्यावर सगळ्यांनी त्याला 'त्याचा प्रवास चांगला व्हावा' अशा शुभेच्छा दिल्या. मित्तो शांतपणे उभी होती. तिच्या गळ्यात दावण बांधायला लागल्यावर तिनं प्रेमभरानं रुबिनचा हात चाटला होता. मित्तोचा माणसांवर भरवसा होता. आजूबाजूचे लोक तिला नेहमी खायला देत असत. त्यांनी मित्तोला कधीच त्रास दिला नव्हता.

रुबिन आणि मित्तो यांचा शहराकडे प्रवास सुरु झाला. वाटेत त्यांना शेतं, झाडं आणि वेळूच्या झोपड्या दिसत होत्या. ते निघाले तेव्हा आकाशात सूर्य तेजानं तळपत होता. मात्र नंतर अचानक हवा बदलली. पूर्व दिशेला निळ्या आभाळात एक सावळा मेघ आकाशात पसरायला लागला. गार वारं वाहू लागलं. कावळे जमिनीच्या दिशेला 'काव काव' करत उडायला लागले. खरं तर ती सकाळची वेळ असूनही संध्याकाळ झाल्यासारखा काळोख सगळीकडे दाटला. आधी बारीक थेंब आकाशातून पडायला सुरुवात झाली आणि त्याबरोबर मऊशार बर्फाची भुरभुर सुरु झाली. मात्र हळूहळू हिमवृष्टी खूपच वाढली. आपल्या १२ वर्षांच्या आयुष्यात रुबिननं अनेक ऋतू पाहिले होते. मात्र इतका बर्फ पडताना तो प्रथमच पहात होता. थोड्याच वेळात त्या दाट बर्फामुळे समोरचा स्ता भरुन गेला. आपण कुठे आहोत हेच रुबिनला कळेनासं झालं आणि तो पुरता गोंधळला. थंडगार बोचरं वारं त्याच्या जाकिटाच्या आत शिरल्यानं तो गारठलाही होता. मित्तो पण १२ वर्षांची होती. तिला बर्फाची सवय असली तरी आता तिचे पायदेखील त्या भुसभुशीत बर्फावरुन घसरत होते. तिनं रुबिनकडे एकदा पाहिलं, 'आपण इतक्या बर्फात घराबाहेर काय करतोय?' असंच जणू ती नजरेनं विचारत होती.

हळूहळू बर्फाच्या खड्यांचा आकार मोठा होत गेला. रुबिनच्या बुटांना आपल्या पायाखाली शेतजमीन आहे हे जाणवत होतं. आपण रस्ता चुकलो आहोत आणि भटकलो आहोत हे त्याच्या लक्षात आलं होतं. पूर्व किंवा पश्चिम या दिशा अथवा गाव किंवा शहर कोणत्या बाजूला आहे यातलं त्याला काहीच कळत नव्हतं. गार वाऱ्यानं सगळीकडे बर्फ उडत होतं. मित्तो आता एका जागी थांबली. तिला एक पाऊल पुढे टाकणं अशक्य होतं. आपले पुढचे दोन पाय जमिनीत घुसवून ती घराकडे परतायचे संकेत द्यायला लागली. रुबिनला एक चांगलं कळत होतं – आता कुठे आश्रय मिळाला नाही तर आपली दोघांची या बर्फात समाधी तयार होईल!

ही काही मामुली बर्फवृष्टी नव्हती. त्यांचे पाय आता घोट्यापर्यंत बर्फात बुडाले होते. त्याचे हात बधीर झाल्यामुळे हाताच्या पंज्याची संवेदनाच नष्ट झाली होती. मित्तोचं सुरुवातीचं विव्हळणं आता रडक्या स्वरात सुरु झालं होतं. ज्या माणसांवर तिनं आजपर्यंत भरवसा केला ती माणसं आता तिला पुरायलाच निघाली होती. रुबिननं आता प्रार्थना करायला सुरुवात केली, देवा, मला आणि या निरपराध बकरीला वाचव!

एवढ्यात त्याला एक छोटीशी टेकडी दिसली. बर्फाची इतक्यात टेकडी कशी तयार झाली असा विचार रुबिनच्या मनात आला. मात्र जवळ गेल्यावर तो वाळलेल्या गवताचा ढिगारा असल्याचं त्याच्या लक्षात आलं. त्यावर बर्फ साचलं होतं. ती टेकडी पाहून रुबिनच्या मनात आशा पालवली. पुढे काय करायचं ते त्या गावात रहाणाऱ्या मुलाला माहिती होतं. त्यानं प्रथम त्या ढिगाऱ्यावरचा बर्फाचा थर दूर केला. मग त्यातलं गवत हातानं बाजूला करुन आपण आणि मित्तो यांना आत बसता येईल असा खळगा तयार केला. आता ते आत जाऊन बसल्यावर बाहेर कितीही गारठा असला तरी आत उबदार वाटणार होतं. तसंच आत मित्तोला खायला चाराही होता. मित्तोला जसा चाऱ्याचा वास लागला तसं तिचं विव्हळणं बंद झालं. तिनं चारा खायला सुरुवात केली. बाहेर बर्फ पडतच होता. त्यामुळे रुबिननं डोक्यावर गवताचा थर पांघरला. त्या थरातून हवा येण्यासाठी काठीनं एक भोक पाडलं.

पोटभर चारा खाऊन झाल्यावर मित्तो आपले मागचे पाय दुमडून आरामात बसली. माणसांवरचा तिचा विश्वास नव्यानं प्रस्थापित झाला असावा! रुबिननं सोबत आणलेल्या रोट्या आणि पनीर खाल्लं. मात्र या दुर्धर प्रसंगात त्याला जास्तच भूक लागली होती. मित्तोची आचळं दुधानं भरली होती. मग रुबिन तिच्याशेजारी झोपला आणि तिची आचळं पकडून थेट दूध

प्यायला लागला. ते दाट आणि गोडसर दूध पिऊन रुबिनला छान वाटलं. तसंच या घराची दारं, छत आणि भिंती सगळ्या खाण्याजोग्या असल्याचं पाहून मित्तोही खुष होती.

रुबिननं हवेसाठी पाडलेल्या वरच्या भोकातून डोकावून पाहिलं. बाहेर एकदम घनदाट काळोख होता. बर्फवृष्टीनं काळोख दाटला होता का रात्र झाली होती? ते समजायला मार्ग नव्हता. देवाच्या कृपेनं गवताच्या त्या गुहेत तितकीशी थंडी जाणवत नव्हती. त्या ढिगाऱ्यात बाहेरच्या गवतफुलांचा मंद दरवळ येत होता. मित्तोच्या शरीरावरच्या लोकरीमुळेही तिथे उबदार वाटत होतं. मग रुबिननं बकरीभोवती हात टाकले. खरं तर त्याचं मित्तोवर फार प्रेम होतं. आज तर मित्तो त्याला आपल्या छोट्या बहिणीसारखी वाटत होती. तिथे त्याला एकटं वाटत होतं आणि आपल्या कुटुंबियांची आठवण येत होती. मग तो मित्तोशीच बोलायला लागला.

'आपल्यावर जो प्रसंग गुदरला आहे, त्याबद्दल तुला काय वाटतं?'

'बें... ' असं बकरीनं उत्तर दिलं.

'मला जर हा गवताचा ढिगारा दिसला नसता, तर आपण दोघंही मरुन गेलो असतो.'

'बें.. बें.. '

'असाच बर्फ पडत राहिला, तर आपल्याला इथे किती दिवस रहायला लागेल कोण जाणे?'

'बें.. बें.. '

'तुला बोलता येत नाही. पण तुला माझी भाषा समजते, हे मला माहिती आहे. आपल्या दोघांना एकमेकांची गरज आहे. बरोबर ना?'

'बें... ' मित्तोचा हा बें जवळपास झोपेतच आला होता. रुबिननंही मग गवताचीच उशी केली आणि तो झोपी गेला.

रुबिनचे डोळे उघडले तरी रात्र आहे का दिवस याचा पत्ताच लागत नव्हता. हवेसाठी पाडलेल्या भोकावर बर्फ जमा होऊन ते बंद झालं होतं. मग रुबिननं काठी घालून परत एकदा ते भोक मोकळं केलं. बाहेर अजून काळोखच होता. बर्फ पडतच होता आणि गार वारा थैमान घालत होता. मित्तोनं पण डोळे उघडले. रुबिननं तिच्याकडे पाहिल्यावर तिनं परत एकदा 'बें बें.. ' असा आवाज केला. 'थंडीचा कडाका असो वा उन्हाची होळी, भूक असो वा भरलं पोट, काळोख असो वा प्रकाश, देवानं जे काही दिलंय त्याचा आपण खुल्या मनानं स्वीकार करायला हवा' असंच जणू मित्तो त्या आवाजातून सांगू पहात होती. झोपून उठल्यावर रुबिनला परत भूक लागली होती. मित्तोकडे भरपूर दूध असल्यानं तो मजेत होता. दिवसभर मित्तो कधी डावीकडचं, कधी उजवीकडचं, कधी वरचं, तर कधी खालचं गवत खायची.

रुबिन आणि मित्तो यांनी त्या गवताच्या ढिगाऱ्यात असे तीन दिवस घालवले. रुबिन मित्तोबरोबर वाढला असल्यानं त्याचं मित्तोवर अपरंपार प्रेम होतं. मात्र या तीन दिवसात त्याचं ते प्रेम शतपटीनं वाढलं. मित्तोचं दूध आणि उबदारपणा यानंच तो जगला होता. तसंच मित्तोचा शांतपणा पाहून रुबिनही मनानं स्थिर होता. त्या तीन दिवसात रुबिननं मित्तोला बऱ्याच गोष्टी ऐकवल्या होत्या. मित्तो ते सगळं आपले कान टवकारुन ऐकायची. रुबिनं मित्तोच्या डोक्यावरुन प्रेमानं हात फिरवायचा आणि

मित्तो त्याचे हात प्रेमानं चाटायची. तिच्या बें..चा अर्थ, मलाही तू आवडतोस असाच असायचा. तीन दिवसांनंतर बाहेरचं वादळ जरा शांत झालं. बाहेर वर आकाशात चंद्र उगवला. आभाळभर पसरलेल्या चांदण्यात दूरवरचं बर्फ चमकायला लागलं होतं. मग रुबिन त्या गवताच्या ढिगाऱ्यातून बाहेर आला. बाहेर शुभ्र शांतता पसरली होती.

चौथ्या दिवशी सकाळी रुबिनला बाहेर बर्फावर चालणाऱ्या ढकलगाडीचा आवाज आला, म्हणजे गवताचा ढिगारा रस्त्याच्या जवळ होता! त्या ढकलगाडीतल्या माणसानं रुबिनला शहराचा नव्हे तर गावाचा परतीचा मार्ग दाखवला. ढिगाऱ्यात असताना 'आपण मित्तोला कधीच विकणार नाही' अशी रुबिननं शपथ घेतली होती.

इकडे रुबिनच्या कुटुंबियांनी आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांनी दरम्यान रुबिनला आणि मित्तोला शोधायचा चिक्कार प्रयत्न केला. मात्र त्यांना त्या दोघांचा मागमूसही लागला नव्हता. ते दोघं कायमचे नाहीसे झाले असंच त्यांना वाटत होतं. रुबिनची आई आणि बहिणी यांचं रडणं थांबतच नव्हतं. त्याचे वडिल वरुन जरी आपण शांत असल्याचं दाखवत असले तरी आतून तेही हादरले होते. तेवढ्यात एक शेजारी धावत धावत आला. त्यानं रुबिन आणि मित्तो यांना रस्त्यावरुन येताना पाहिलं होतं. मग रुबिनच्या घरच्यांचा मनात आनंदाची लहर उसळली. रुबिन तिथे पोचल्यावर त्यानं - आपण कसे ढिगाऱ्यात लपून बसलो आणि मित्तोचं दूध पिऊन कशी भूक भागवली – अशी सगळी कहाणी घरच्यांना ऐकवली.

मग घरातल्या सगळ्यांनीच मित्तोला विकायचा निर्णय रद्द केला. आता थंडीचा कडाका वाढल्यानं लोकांना उबदार कातडं हवं होतं. मग एरेनचा धंदा चालायला लागला. हनुक्का या सणाला रुबिन, मिरियम आणि एना यांनी मेणबत्त्या पेटवून ड्रायडिल नावाचं एक वाद्य वाजवलं. मित्तो दूर बसून मेणबत्त्या आणि या मुलांकडे पहात होती!

या प्रसंगानंतर अनेकदा मित्तो, तुला आपण गवताच्या ढिगाऱ्यात राहिलो ते दिवस आठवतात का? असं रुबिन तिला विचारायचा. मग मित्तो हसल्यासारखं करुन आपलं पांढरंशुभ्र डोकं हलवून 'बें.. ' असा आवाज करायची. या एकाच शब्दातून तिचे सगळे विचार आणि प्रेम व्यक्त व्हायचं.

३ नोव्हेंबर २०१६